# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त
स्थापना वर्ष - १९५८
पद्व्युत्तर प्रवेश विभाग

---

संदर्भ क.: प.प्र.विभाग/ प्रवेश पुर्व परिक्षा/ २०१८-२०१९/ 762-1297 दि.१०-०३-२०१८.

प्रती,
विभाग प्रमुख व प्राचार्य/ प्राचार्या/ संचालक,
सर्व शैक्षणिक विभाग व संलग्नीत महाविद्यालये/ परिसंस्था,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

विषयः- शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ च्या पद्व्युत्तर अभ्यासकमाच्या प्रवेश पुर्व परिक्षेबाबत.....

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास पद्व्युत्तर अभ्यासकमाच्या प्रवेश पुर्व परिक्षा २०१८-२०१९ चे समन्वयक यांच्या निर्देशान्वये असे कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर, उप परिसर, उस्मानाबाद, मॉडेल कॉलेज, जालना व सर्व संलग्नीत महाविद्यालयात या विद्यापीठामार्फत शिकविण्यात येणा-या पद्व्युत्तर अभ्यासकमाची प्रवेश पुर्व परिक्षा हया महाराष्ट्रातील दि. २७/०३/२०१८ रोजी नंतर दिलेल्या विविध दैनिक वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने दि.१६-०४-२०१८ ते दि. ०१-०५-२०१८ पर्यत घेण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने आपण आपल्या महाविद्यालयातील पदवी परिक्षा देणा-या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये होणा-या पद्व्युत्तर अभ्यासकमाच्या प्रवेश पुर्व परिक्षेबाबत आकलन होण्यासाठी आपण आपल्या महाविद्यालयाच्या सुचना फलकावर संबंधित सुचना लावून मार्गदर्शन करावे व त्यांना पद्व्युत्तर अभ्यासकमाच्या प्रवेश पुर्व परिक्षेच्या नोंदणी करिता सुविधा उपलब्ध करुन देव्यात.

तसेच, पद्व्युत्तर अभ्यासकमाची प्रवेश पुर्व परिक्षा २०१८-२०१९ बाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध असून त्याचे अवलोकन करुन त्यात दिलेल्या निर्देशानुसार अमलबजावणी करण्याबाबत सदरील विद्यार्थ्यांना सुचित/ मार्गदर्शन करावे व काही अडचणी उद्भवल्यास सर्व अधिष्ठाता यांना संपर्क करावा.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

ठाकरे हेमलता गुलाबराव
सहाय्यक कुलसचिव,
10.03.18